॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२२ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूविज्ञान प्रशाळा आणि नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस इंडीया (NASI), प्रयागराज यांच्या संयुक्त विद्यमाने जिओमेडीकल हेल्थ हजार्ड ॲण्ड इन्वोनमेनटल प्रॉब्लेमस इन ट्रायबल एरीया या विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील वेबिनारचे आयोजन गुरुवार, दि.१७ सप्टेंबर रोजी करण्यात आले.

कोरोना प्रादूर्भावामुळे सद्यस्थितीत दैनंदिन जीवनात झालेल्या बदलामुळे आरोग्य व स्वच्छता या दोन बार्बीना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. आदिवासी बंधू भगिनींच्या आरोग्य विषयक जनजागृती व चर्चा करण्यासाठी या बेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबिनारचे उद्‌घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून प्रसिध्द वनस्पती शास्त्रज्ञ पद्मश्री प्रा.मंजू शर्मा हया होत्या. विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार यांची प्रमुख उपस्थिती यावेळी होती. प्रा.शर्मा यांनी आदिवासी बंधू भगिनींच्या कल्याणासाठी नासी संस्थे तर्फे चालवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. विशेष अतिथी म्हणून प्रसिध्द रसायनशास्त्रज्ञ, नासी, प्रयागराजचे अध्यक्ष पद्मभूषण प्रा. जी. पद्मनाभन यांनी मलेरिया आणि आदिवासी बांधवांची जीवनशैली, आरोग्य यावर मार्गदर्शन केले. पुणे येथील इंडीयन इंन्स्टिटयुट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजीचे डॉ.मिलिंद मुजुमदार यांनी आदिवासी बंधू भंगिनींच्या घरासाठी व निरोगी आरोग्यासाठी खेळत्या हवेचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. रावेर येथील डॉ.अतुल सरोदे यांनी आदिवासी बांधवांच्या दैनंदिन जीवनातील आरोग्यविषयक समस्या व उपाययोजना यावर आपले विचार मांडले. वेबिनारचे समन्वयक डॉ.सं.ना.पाटील यांनी शुध्द पेयजल आणि आदिवासी बहुल भागात भूशास्त्राचा लोककल्याणासाठी वापर आणि महत्त्व याबाबतची माहिती दिली. या वेबिनारमध्ये भारतातील विविध ३० राज्यांतील ५०० व्यक्तींनी सहभाग नोंदविला. प्रा.एस.टी.इंगळे हे बेबिनारचे उपसमन्वयक होते. सूत्रसंचालन प्रा.एस.बी.अत्तरदे व प्रा.वि.म.रोकडे यांनी केले. तर आभारप्रदर्शन प्रा.सं.ना.पाटील व डॉ.संतोष शुक्ला यांनी केले.या वेबिनारच्या यशस्वीतेसाठी पर्यावरण व भूविज्ञान प्रशाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व संशोधक विद्यार्थी यांनी प्रयत्न केले.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०२० दिनांक : २२.९. २०२०

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

जनसंपर्क अधिकारी करीता